US Agriseeds® Seed that Works

SeedWorks®

25 YEARS OF SERVING FARMERS

## US 7711




- परिपक्वतेचा कालावधी 80-85 दिवस
- उच्च धान्य आणि चाऱ्याचे उत्पादन
- जाड दाणे असलेले लांब आणि दाट कणीस
- चांगली उभे राहण्याची क्षमता आणि स्वच्छ हिरवा चारा
- खरीप आणि रब्बी हंगामासाठी योग्य

## US 7771

- पेरणीनंतर 75-78 दिवसांनी परिपक्वता कालावधी
- दाट, गोलसर, एकसमान भरीव कणसे
- अधिक दाणे, चारा नेहमी हिरवागार
- लोळण्याबद्दल सहनशील
- खरीप आणि रब्बी हंगामासाठी योग्य




## US 7512




- लवकर पक्वता: 75 दिवस
- एकसमान मध्यम उंची आणि अधिक धान्याचे उत्पादन
- उच्च लोह घटक (आयर्न)
- लोळणे, ब्लास्ट (करपा) आणि रस्ट (तांबेरा) रोगांसाठी सहनशीलता
- खरीप रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी योग्य

# बाजरी पीक व्यवस्थापन

## शेत जमिनीची मशागत:

सुरवातीला माती फिरवणाऱ्या नांगराने जमीन नांगरली पाहिजे आणि चांगली खोल मशागत मिळेपर्यंत वारंवार वखरणी  चालू ठेवावी.

## पेरणीची योग्य वेळ:

| | |
|---|---|
| खरीप मध्ये पेरणीची वेळ | जून जुलै |
| उन्हाळ्यात पेरणीची वेळ | 15डिसेंबर ते 15 फेब्रुवारी |
| बियाण्याचा दर | 1.5 किलो /एकरी |
| अंतर | 45सेमी X 15सेमी |
| खोली | 2-3 सेमी |

## खत व्यवस्थापन:

- खतांचा वापर माती परीक्षण अहवाल आणि स्थानिक राज्य कृषी विद्यापीठांच्या शिफारशींवर आधारित असावा.खतांचा सामान्य शिफारस केलेला डोस खाली दिलेल्या तक्त्यानुसार आहे.
- चांगले कुजलेले शेणखत दहा मेट्रिक टन प्रति एकर प्रति एकर प्रमाणे टाकावे.

| खताचा डोस | बेसल (किलो /एकर) | पहिल्या पाणी देण्याच्या वेळेस (किलो /एकर) | एकूण (किलो /एकर) |
|---|---|---|---|
| यूरिया | 18 | 52 | 70 |
| डी ए पी | 35 | – | 35 |
| एमओपी | 20 | – | 20 |

## पाणी व्यवस्थापन:

फुटवे येण्याची अवस्था आणि फुलोरा व दाणे भरण्याची अवस्था या बाजरी पिकाला पाणी द्यायच्या महत्त्वाच्या अवस्था आहेत.

## तण नियंत्रण:

साधारणपणे पेरणीनंतर 20-25 दिवसांत एकदा हाताने खुरपणी करावी लागते आणि त्यानंतर 10-15 दिवसांनी एकदा आंतरमशागत करावी लागते. तणांशी स्पर्धा केल्यास धान्य उत्पादन 25-50% कमी होते. तणनाशक -ॲट्राझिन हे प्रति हेक्टर 500 ग्रॅम दराने वापरता येते.

## कीड व रोग नियंत्रण:

| रोगाविषयी तपशील | नियंत्रण |
|---|---|
| करपा | 5% झाडे प्रभावित झाल्यावर प्रोपिकोनाझोल @ 1 मिली/लिटर पाण्यात फवारणी करा |
| गोसावी रोग | सुरुवातीची लक्षणे दिसताच संक्रमित झाडे काढून टाका, मेटालॅक्सिल 4% + मॅन्कोझेब 64% @ 2 ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करा. |
| हुमणीअळी | थायमेथोक्सम 0.9% + फिप्रोनिल 0.2% जीआर @ 5 किलो/एकर  द्या. |
| खोडमाशी | उगवण झाल्यानंतर 10-15 दिवसांनी प्रोफेनोफॉस @20 मिली/15 लिटर पाण्यात फवारणी करा. |
| कणीस मधील अळी | कोराजेन @6 ग्रॅम/15 लिटर पाण्यात फवारणी करा. |
| खोडकिडा | कोराजेन @6 ग्रॅम/15 लिटर पाण्यात किंवा सायपरमेथ्रीन +क्लोरोपायरीफॉस @25 मिली/15 लिटर पाण्यात फवारणी करा |
| नाकतोडा | सायपरमेथ्रीन + क्लोरोपायरीफॉस @25 मिली/15 लिटर पाण्यात फवारणी करु शकता. |

## कापणी व मळणी:

जेव्हा बाजरीच्या दाण्याच्या खालचा भाग काळसर दिसायला लागतो तेव्हा बाजरी पीक हे कापणी लायक झाले आहे असे समजणे.जेव्हा पीक तयार होते तेव्हा पाने पिवळी पडतात आणि जवळजवळ सुकलेली दिसतात.दाणे कडक आणि टणक असतात.13% किंवा त्यापेक्षा कमी आर्द्रता असलेले धान्य कोरडे मानले जाते. दीर्घकालीन साठवणुकीसाठी (6 महिन्यांपेक्षा जास्त), धान्यातील आर्द्रतेचे प्रमाण 12% पेक्षा कमी असावे.